ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १९ — पुणें, बुधवार तारीख १८ मार्च, १९५३ — अंक ११

## विविध माहिती

**६८५ वर्षे वयाचा योगी ?**—दिल्ली येथें यमुनेच्या कांठीं नऊ दिवसांची स्थलसमाधी घेतलेले एक योगी त्या प्रयत्नांत कालवश झाल्याचें प्रसिद्धच आहे. परंतु कोचीन येथें प्रभाकर नंबुद्री नांवाचे एक योगी ६८५ वर्षांचे असून त्यांची प्रकृति अद्यापहि उत्तम आहे असें समजतें. श्री. नंबुद्री ह्यांनीं ४०० वर्षें तर हिमालयांत तप करण्यांतच घालविलीं आहेत, असें म्हणतात.

**उदयशंकर मॉस्कोला जाणार**—सुप्रसिद्ध नृत्यपटु उदयशंकर आणि त्यांच्याबरोबरचे कलावंत रशिआंतील प्रमुख शहरांतून आपले कार्यक्रम करणार आहेत असें समजतें. त्यांच्यासाठी एक कार्यक्रम आखण्यांत येत आहे. भारतीय सरकारनें तो मान्य केल्यावर हे सर्व कलावंत एप्रिलच्या मध्याच्या सुमारास रशिआला जाण्यास निघतील.

**रासायनिक कारखाना**—ई. मर्क अँड कंपनी ह्या नांवाची एक सुप्रसिद्ध जर्मन रासायनिक कंपनी भारतांत औषधांचा कारखाना काढण्याचा विचार करीत आहे. कारखाना जर्मन व हिंदी भांडवलाचा असेल. कारखाना काढण्याची शक्यता अजमावून पहाण्यासाठी डॉ. कर्प्स मर्क हे सध्यां भारतांत आले आहेत.

**कामगारांसाठी घरें**—१९५३–५४ ह्या आर्थिक वर्षांत कामगारांना लागणारीं घरें बांधण्यासाठी भारतीय सरकारनें उत्तर–प्रदेश सरकारला २३० लाख रुपये कर्ज व मदत ह्या स्वरूपांत देण्याचें मंजूर केलें आहे. आग्रा, कानपूर व फेरोझाबाद ह्या मोठ्या शहरांतून कामगारांसाठी घरें बांधण्यांत रकम खर्च होणार आहे.

**अफगाणिस्थानांतील सर्वांत मोठा बोगदा**—अफगाणिस्थानच्या रस्त्यांच्या मार्गावरील सर्वांत मोठा बोगदा नुकताच पूर्ण करण्यांत आला. त्याचें काम ८ वर्षांपूर्वीं चालू झालें होतें. बोगदा ४२० फूट लांब असून त्यामुळें पेशावर–काबूलमधील अंतर ९ मैलांनीं कमी होईल आणि एका अवघड घाटाची वाट तुडवण्याचें टळेल.

**रशिआचा रत्नखचित नकाशा**—लेनिनग्रॅड येथील हर्मिटेज वस्तुसंग्रहालयांत रशिआचा एक रत्नखचित नकाशा ठेवण्यांत आला आहे. नकाशांत ५०,००० रत्नें वापरण्यांत आलीं असून गेल्या महायुद्धांत झालेल्या प्रमुख लढायांचीं ठिकाणें प्रामुख्यानें दाखविण्यांत आलीं आहेत. शहरें, नद्या, इत्यादींसाठी वेगवेगळीं रत्नें वापरण्यांत आलीं आहेत. नकाशा ३०० चौरस फुटांचा आहे.

**प्राध्यापकांची देणगी**—नागपूर येथील हिस्लॉप कॉलेजमधील सेवानिवृत्त प्राध्यापक श्री. हरदास ह्यांनीं सीतावर्डी येथील इस्पितळाला १०,००० रुपयांची देणगी आपल्या पत्नीच्या स्मरणार्थ दिली आहे. ह्या रकमेचा विनियोग प्रसूतिगृह बांधण्यासाठीं करण्यांत यावयाचा आहे.

**मोटारींच्या किंमतीवरील नियंत्रण रद्द**—अमेरिकेचे अध्यक्ष मि. आयझेनहोअर ह्यांनीं ३० एप्रिलपूर्वीं सर्व आर्थिक नियंत्रणें रद्द करण्यांत यावीत असें बोलून दाखविलें होतें. त्याप्रमाणें त्यांनीं विनियंत्रण करण्यास प्रारंभ केला आहे. मोटारी, पाव, घरकामासाठीं लागणाऱ्या वस्तु, क्ष किरणांचीं यंत्रें, इत्यादींच्या किंमतीवरील नियंत्रणें नुकतींच रद्द करण्यांत आलीं आहेत.

**भारत–ब्रिटन लोकरीचा व्यापार**—भारत आणि ब्रिटन ह्यांच्यामधील लोकरीच्या व्यापाराची १९५२ मध्यें बरीच वृद्धि झाल्याचें आढळून आलें आहे. भारतानें १·७५ कोटी पौंड लोकर ब्रिटनला निर्यात केली. १९५१ सालीं १·४ कोटी पौंड लोकर निर्यात करण्यांत आली होती. ब्रिटनकडून भारत आयात करीत असलेल्या लोकरींतहि वाढ झाली.

**सर्कसमध्यें काम करणारे सील प्राणी**—सर्कसमध्यें काम करण्यास शिकवलेले तीन सील प्राणी जर्मनीहून मागविण्यांत आले होते. ते नुकतेच कलकत्त्याला दाखल झाले आहेत. आसाम व बिहारमध्यें फिरणाऱ्या एका सर्कसनें ते मागविले आहेत. त्यांना पाण्याच्या टाक्यांत घालून आणण्यांत आलें.

**मॉस्कोचें जोरदार ध्वनिक्षेपण**—मॉस्को नभोवाणीनें आपल्या परकीय भाषांतील कार्यक्रमांसाठी नवीन जोरदार केंद्र चालू केलें आहे, असें समजतें. स्टॅलिनच्या मरणानंतर प्रचाराला अधिक धार देण्याची ही व्यवस्था आहे असें म्हणतात. कार्यक्रम २७५ किलो-सायकल्स अथवा १,०९० मीटर्सवर ऐकूं येतो.

**कैद्यांसाठी रेडिओ**—हैद्राबादच्या सरकारनें लांब मुदतीच्या शिक्षा झालेल्या कैद्यांना थोड्या मुदतीच्या रजा देण्यास प्रारंभ केला आहे. कैद्यांना आपल्या नातलगांसमवेत कांहीं काळ घालवितां यावा म्हणून ही सुधारणा करण्यांत आली आहे. त्याशिवाय तुरुंगांत कैद्यांच्या उपयोगासाठी एक रेडिओहि ठेवण्यांत आला आहे.

**राज्यारोहणप्रसंगीं देणगी**—इंग्लंडची राणी एलिझाबेथ हिच्या राज्यारोहणप्रसंगीं भारतीय सरकार भारी किंमतीची एक मूल्यवान बनारसी शाल तिला भेट म्हणून देणार आहे. ही शाल काळ्या सॅटिनची असून तीवर उत्कृष्ट जरीकाम केलेलें आहे.

## THE BANK OF KARAD LIMITED.

**KARAD, (Dist. N. Satara)**

# NOTICE

Notice is hereby given that the Seventh Ordinary General Meeting of the Shareholders of the Bank of Karad Limited will be held at the Registered Office of the Bank at Karad on Sunday the 22nd day of March 1953 at 4 P. M. (S. T.) to transact the following business:—

1. To receive and consider the Balance Sheet, the Profit and Loss Account and the Reports of the Directors and of the Auditors for the year ended 31st December 1952.
2. To declare a Dividend.
3. To elect three Directors in place of the retiring Directors.
4. To appoint Auditors and to fix their remuneration.
5. To transact such other business as may be allowed by the Chairman.

Karad,<br>Dated 22nd February<br>1953.

By Order of the Board,<br>**M. V. Khandkar,**<br>Manager.

*N. B.*—The Share Transfer Books of the Bank will be closed from the 16th day of March 1953 to the 28th day of March 1953 (both days inclusive).


# पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लि.

**१९५।१९६ भवानी पेठ, गूळ आळी, पुणें २.**

**तारेचा पत्ताः—सॅनको सोप. टेलिफोन नं. ३२१५**

(जिल्ह्यांतील शेतकरी व नागरी जनतेस दैनंदिन गरजेच्या वस्तु पुरविणें व शेतकऱ्यांचा माल किफायतशीर विकून देणें, या उद्देशानें स्थापन झालेली जिल्ह्यांतील मध्यवर्ती संस्था)

## संस्थेकडे खालीलसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

★ शेतीचीं सर्व प्रकारचीं अवजारें, ऊंस गाळण्याचे चरक, सल्फेट व इतर खतें, पिकांच्या रोगांवरील औषधें, पेंड.

★ शेतकी खात्यामार्फत जिल्ह्यांत होणारें पेंड, खतें व मिश्रखत यांचें वाटप या संस्थेमार्फतच करण्यांत येतें.

★ पुणें जिल्हा ग्रामसुधारणा मंडळाच्या विद्यमानें चालू असलेल्या नियंत्रित लोखंड, सिमेंट वाटप योजनेंतील—गाड्यांचे आंस, धावपट्ट्या, नळीचे पत्रे, प्लेन पत्रे, वगैरे व सिमेंट.

★ ग्राहक सहकारी संस्थांना लागणारा माल संघाच्या अडत दुकानामार्फत पुरविला जातो.

★ शेतकऱ्यांचा शेतीचा माल संस्थेच्या अडत दुकानामार्फत पुणें येथील बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जातो.

★ जिल्ह्याबाहेरील शेतकरी व सहकारी संस्था यांचा माल पुणें बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जाईल.


**हैद्राबादमधील बँकांचें एकीकरण**—मर्कंटाइल बँक ऑफ हैद्राबाद आणि हैद्राबाद स्टेट बँक ह्या बँकांचें एकीकरण करण्यास रिझर्व्ह बँकेनें संमति दिली आहे. एकीकरण बहुधा पुढील महिन्याच्या प्रारंभापासून अंमलांत आणलें जाईल.

**पोस्टांचें यांत्रिकीकरण**—भारतामधील पोस्टांतुन यंत्रांचा अधिक उपयोग करण्याच्या कामीं सल्ला देण्यासाठीं ब्रिटनच्या जनरल पोस्ट ऑफिसमधील दोन अधिकारी भारतांत येणार आहेत. दोहोंपैकी एकजण तांत्रिक सल्लागार आहे.

## BANK OF POONA LIMITED

DIRECTORS' REPORT

AND

STATEMENT OF ACCOUNTS

FOR THE

*Year ended 31st December 1952.*

NOTICE is hereby given that Seventh Annual Ordinary General Meeting of the Share Holders of the Bank of Poona Limited will be held at the Registered Office of the Bank, 455 Raviwar Peth, Poona City, on Saturday the 28th March 1953 at 5-30 P. M. (Standard time) to receive the Report of the Directors and the Audited Accounts for the year ended 31st December 1952, to elect Directors in place of those retiring by rotation and to appoint Auditors and fix their remuneration.

Poona City.<br>7-2-53

By Order of the Board,<br>G. G. SATHE,<br>Manager.

*N. B.*—The Transfer Books of the Bank will be closed from Saturday the 21st March 53 to Saturday the 4th April 1953; both days inclusive.


# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

**—पुणें शहर—**

**लक्ष्मी रोड**

**पोस्ट बॉक्स नं. ५११] [टेलिफोन नं. २४८३**

भोर, पौड व वडगांव (मावळ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतहीं सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठीं कर्जें देणें, सोनें–चांदीचे तारणावर कर्जें देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

**चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.**

**अेक ते दहा वर्षें मुदतीच्या ठेवीही स्वीकारल्या जातात.**

१ वर्ष २ टक्के, २ वर्षें २॥ टक्के, ५ वर्षें ३ टक्के, ७ वर्षें ३॥ टक्के, १० वर्षें ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ९ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.

**दराबद्दल समक्ष चौकशी करावी.**

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्याखेरीज पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टस् व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

**मो. वि. रवडे,**<br>मॅनेजिंग डायरेक्टर.

# अर्थ

बुधवार, ता. १८ मार्च, १९५३





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## चांदी गाळण्याचा कारखाना

दुसरें महायुद्ध चालू असतांना भारतानें अमेरिकेकडून उधार-उसनवार योजनेप्रमाणें कांहीं चांदी घेतली होती. ती परत करण्याची वेळ आतां जवळ येत चालली आहे. अलिपूर येथें चांदी गाळण्याचा कारखाना उभारण्यांत येणार असून त्यासाठी जर्मन यंत्रसामुग्री बसविण्याचें ठरल्याचें समजतें. ह्या कारखान्यांत ज्या पद्धतीनें चांदी गाळण्यांत येणार आहे तिचें नांव जर्मन भाषेंत 'डिमॅग' असें आहे. ह्या पद्धतीनें चांदी गाळतांना अलिपूर येथील कारखान्यांत दरवर्षी सुमारें ३,६०० टन 'इलेक्ट्रोलिटिक कॉपर' तयार होऊं शकेल. सध्यां भारतांत 'इलेक्ट्रोलिटिक कॉपर' तयार होत नाहीं त्यामुळें अलिपूर येथील कारखान्याला फार महत्त्व आहे. कारखान्यांत जी यंत्र-सामुग्री वापरण्यांत येणार आहे ती चालविण्याचा खर्च फारच कमी असतो. पूर्वी टांकसाळींत जी पद्धत वापरण्यांत येत असे तिमुळें १ पौंड चांदी गाळण्यास २·३४३ रुपये खर्च येत असे. नवीन जर्मन पद्धतीमुळें १ पौंड चांदी गाळण्यास अवघा १·४६६ रुपये खर्च येईल. 'डिमॅग' पद्धतीच्या जर्मन यंत्रसामुग्रीची मागणी नोंदण्यांत आली असून ती लवकरच भारतांत येईल असा अंदाज आहे. ती शक्य तितक्या लवकरच उभारली जाणें अवश्य आहे. कारण, अमेरिकेची चांदी परत करण्याची वेळ जवळ येत चालली आहे. मूळ ही चांदी २८ एप्रिल, १९५२ रोजीं घेण्यांत आली होती. तेव्हांपासून पांच वर्षांनीं म्हणजे २७ एप्रिल, १९५७ रोजीं घेतलेली चांदी अमेरिकेला परत करावयाची आहे. भारतामधील रुपयांत चांदीचा असलेला भाग पूर्वीच्या मानानें कमी करण्यांत आला आहे. आतां इतर नाण्यांतील चांदीहि कमी करण्यांत येण्याचा संभव आहे.

## भारतामधील मधाचा धंदा

इंडिअन कौन्सिल ऑफ बी–कीपिंग ह्या नांवाची एक संस्था दिल्ली येथें नुकतीच स्थापन करण्यांत आली आहे. संस्थेचें उद्घाटन भारताचे शेतीमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख ह्यांनीं केलें. ह्या प्रसंगीं भाषण करतांना डॉ. देशमुख म्हणाले, कीं मधमाशा पाळण्याच्या धंद्याला भारतांत फार मोठा वाव आहे. भारतांत विविध प्रकारच्या वनस्पती आणि विविध प्रकारचें हवामान असल्यामुळें ह्या धंद्याचें भवितव्य उज्ज्वल आहे. भारतांत मधाला चांगली मागणी असून ती दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. मधमाशा पाळणाऱ्यानें त्यांच्या संबंधींची चांगली माहिती करून घेणें आवश्यक आहे. हा धंदा ग्रामोद्योगाच्या स्वरूपाचा असल्या-मुळें त्याला यांत्रिक धंद्याची स्पर्धा होत नाहीं. ग्रामीण जनतेला जोड–व्यवसाय म्हणून तो सहज करतां येईल. तथापि, भारतांत हा धंदा अजून बाल्यावस्थेंत आहे. दरवर्षी फक्त १ कोटी ते १·२ कोटी पौंड मध आपल्या देशांत तयार होतो आणि त्यांपैकी फक्त एकतृतीयांश बाजारांत येतो. अमेरिकेंत दरवर्षी सुमारें २० कोटी पौंड मध तयार होतो आणि तेथें ८ लाख लोक या धंद्यांत गुंतलेले आहेत. इतर देशांतून मधाचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर होतें. मधाचा उपयोग अन्न आणि औषध अशा दोन्हीं प्रकारांनीं होतो. भारतांत मधाच्या उत्पादनाची पद्धत जुनी असल्यामुळें तो शुद्ध असत नाहीं. अर्थातच त्याला बाजार-पेठ सुलभतेनें मिळत नाहीं. ह्या धंद्यांत भांडवलदारांनींहि लक्ष घालण्यासारखें आहे. कारण, लोकांना त्यांच्या फावल्या वेळांत घरबसल्या उद्योग पुरविण्यासारखी त्याची परिस्थिति आहे. आपल्याकडील मध परदेशी मधाच्या तोडीचा असतो अशी लोकांची खात्री झाल्यास देशी मधाचा उठाव होण्यास अडचण पडणार नाहीं. पण त्यासाठीं योग्य दिशेनें प्रयत्न झाले पाहिजेत.

## टेलिव्हिजनमुळें सिगरेटसचा खप कमी झाला

ब्रिटनमधील टेलिव्हिजनच्या कार्यक्रमांत एक आरोग्यविषयक कार्यक्रम प्रक्षेपित करण्यांत आल्यामुळें सिगरेटसूचा खप कमी झाल्याची तक्रार दुकानदार करीत आहेत. ह्या कार्यक्रमांत तंबाखूच्या सेवनामुळें फुप्फुसाचा कॅन्सर होतो असें वैद्यकीय मत डॉक्टर्सनीं बोलून दाखविलेलें होतें. ह्या माहितीमुळें पुष्कळ लोकांनीं सिगरेटस ओढणेंच अजिबात बंद केलें. कित्येकांनीं फिल्टर टिप् सिगरेटस ओढण्यास सुरवात केली आणि कांहीं जणांनीं होल्डर वापरण्यास सुरवात केली. गेल्या तीस वर्षांत फुप्फुसांतील कॅन्सरच्या रोगानें होणाऱ्या मृत्यूंच्या संख्येंत बरीच वाढ झाली असल्याचें ब्रिटनमध्यें आढळून आलें आहे. पण अलीकडे ह्या रोगाचें निदान करण्याची पद्धत सुधारली असल्या-नेंहि वरील संख्येंत वाढ दिसत असावी असें मत व्यक्त करण्यांत आलें आहे. १९२२ सालीं ६१२ लोक वरील रोगानें मेले अशी नोंद केलेली आहे. १९५१ सालापर्यंत ही संख्या १३,२३३ इतकी वाढली. १९६५ सालीं हा रोग दरसालें २५,००० लोकांचे बळी घेण्याइतका फैलावेल असा अंदाज डॉ. होरेस जोन्स ह्या डॉक्टरांनीं केला आहे. डॉ. जोन्स हे सेंट्रल मिडल-सेक्स हॉस्पिटलमध्यें काम करीत असतात. धूम्रपानाच्या व्यसना-मुळें कॅन्सरचा रोग होतो हें मत अलीकडे बऱ्याच सुप्रसिद्ध डॉक्टर्सनीं सांगितलेलें आहे. तथापि हा रोग नियमित पण माफक प्रमाणांत धूम्रपान करणाऱ्यांनाहि होतो किंवा काय ह्याचा खुलासा होणें अगत्याचें आहे. अव्याहत धूम्रपान करणाऱ्यांना तो व्हावा ह्यांत नवल नाहीं. अमेरिकेंतहि असाच अनुभव आलेला आहे. फुप्फुसांतील कॅन्सर झालेले २०० रोगी एका इस्पितळांत तपासले असतांना त्यांच्यापैकीं फक्त ९ जण धूम्रपान न करणारे होते, असें आढळून आलें.

## राजाचा मुकुट छापलेल्या नोटांचें अजूनहि प्रस्थ

३१ डिसेंबर, १९५२ रोजीं राजाचा मुकुट छापलेल्या ५८६ कोटी रुपयांच्या चलनी नोटा प्रचारांत होत्या, आणि अशोक स्तंभाचें चित्र असलेल्या ३९ कोटी रुपयांच्या नोटा प्रचारांत होत्या. १०० रुपयेवाल्या नोटांचे बाबतींत असे आकडे तात्काळ उपलब्ध होण्याजोगे नसल्यानें त्या नोटांचें वरीलप्रमाणें वर्गीकरण करण्यांत आलेलें नाहीं. अशा १०० रुपयेवाल्या नोटा ४२८ कोटी रुपयांच्या आहेत.

## महाराष्ट्र बँकेनें 'पुरोहित ट्रॉफी' जिंकली

### पुण्यांतील बँकांचे क्रिकेट सामने

पुण्यांतील बँकिंग क्षेत्रांत कार्य करणाऱ्या व्यक्तींचा (अधिकारी व नोकरवर्ग) परस्पर परिचय व्हावा, त्यांचे स्नेहसंबंध वाढावेत व त्यामुळें एकमेकांचे धंद्यांतील व्यावहारिक संबंधांतहि सुलभता निर्माण व्हावी या दृष्टीनें येथील भारत इंडस्ट्रिअल बँकेनें आपआपसांत मित्रत्वाचे क्रिकेटचे सामने खेळण्याचा अभिनव उपक्रम सुरू केला. या उपक्रमास इंपीरिअल बँक लष्करमधील उत्साही अकौंटंट श्री. कोडांगे व सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे एजंट श्री. बाळासाहेब पुरोहित यांनीं प्रोत्साहन दिलें. क्रिकेट सामन्यांची कल्पना बँकिंग क्षेत्रांत रुजून ती दृढमूल व्हावी या दृष्टीनें श्री. कोडांगे यांनीं बँकांच्या क्रिकेट सामन्यांची योजना पुण्यांतील बँकांचे चालकांचेकडे प्रसृत केली. विशेष नमूद करण्यासारखी गोष्ट अशी कीं, पुण्यांतील ९ बँकांनीं सामन्यांत भाग घेण्यास संमति दर्शविली व सामना-कमिटीमार्फत हे सामने पुणें येथील वेगवेगळ्या मैदानांवर खेळण्यांत आले. बँकांतील क्रिकेट सामन्यांच्या अभिनव कल्पनेचें चिरस्थायी स्वरूप राहावें या दृष्टीनें सेंट्रल बँकेचे पुणें शाखेचे एजंट श्री. पुरोहित यांनीं स्वखर्चानें 'ट्रॉफी' देणगी देऊन सामनाकमिटीस बहुमोल मदत केली.

### सामन्यांत नऊ बँका सामील

या सामन्यांत पुण्यांतील (१) इंपीरिअल बँक, लष्कर अ टीम (२) इंपीरिअल बँक, शहर ब टीम (३) सेंट्रल बँक ऑफ इंडिया (४) भारत इंडस्ट्रिअल (५) बँक ऑफ महाराष्ट्र (६) युनायटेड कमर्शिअल (७) बँक ऑफ इंडिया, लष्कर (८) प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल (९) देवकरण नानजी, अशा एकूण ९ बँकांनीं भाग घेतला होता. अखेरचा निर्णायक सामना सेंट्रल बँक ऑफ इंडिया व बँक ऑफ महाराष्ट्र यांचे दरम्यान वाडिया कॉलेज मैदानावर होऊन बँक ऑफ महाराष्ट्रानें ४ गडी, ९ धांवांनीं 'पुरोहित ट्रॉफी' जिंकली. हा सामना विशेष चुरशीचा व प्रेक्षणीय असा झाला.

### श्री. पिंपळखरे व श्री. कोडांगे ह्यांचें नैपुण्य

सर्व सामन्यांतून जास्तींत जास्त धांवा काढणाऱ्या खेळाडूस 'बॅटिंग' प्राविण्य कप भारत इंडस्ट्रिअलचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. क्षीरसागर यांनीं ठेविला होता. तो कप मिळविण्याचा मान बँक ऑफ महाराष्ट्रांतील उत्कृष्ट खेळाडू श्री. पिंपळखरे यांनीं आपल्या 'बॅटिंग' नैपुण्यानें एकंदर २३० धांवा काढून मिळविला, हें त्यांना विशेष भूषणावह आहे. तसेंच उत्कृष्ट बोलिंग करणारास इंपीरिअल बँकेचे अकौंटंट श्री. कोडांगे यांनीं 'बोलिंग' प्राविण्य कप ठेविला होता. तो कप मिळविण्याचा मान उत्कृष्ट गोलंदाजी करून श्री. कोडांगे यांनींच मिळविला ही विशेष उल्लेखनीय गोष्ट होय. त्यांच्या बोलिंग प्राविण्याची सरासरी ३·५ अशी पडते.

सामन्यांत भाग घेतलेल्या बँकांच्या टीम्समधून खेळाडूंचे कौशल्य दिसून आलें, त्यांत खालील खेळाडूंचा उल्लेख केल्यास अप्रस्तुत होणार नाहीं. इंपीरिअल बँक... श्री. कोडांगे बॅटिंग व बोलिंग, श्री. वळसणकर, श्री. जोशी बोलिंग. श्री. फर्नांडिस बॅटिंग. शहर शाखेंतील श्री. उंडे बोलिंग. सेंट्रल बँक... श्री. पुरोहित बॅटिंग. श्री. वाडिया बोलिंग व बॅटिंग, श्री. पाजनीदार बोलिंग व बॅटिंग, श्री. तारापोर बॅटिंग, श्री. चिपळकट्टी बोलिंग, महाराष्ट्र बँक... श्री. पिंपळखरे, श्री. जोगदेव बॅटिंग. श्री. रानडे बॅटिंग, बोलिंग. श्री. कानिटकर बोलिंग. बँक ऑफ इंडिया ...श्री. सुखात्मे बोलिंग. भारत इंडस्ट्रिअल... श्री. क्षीरसागर व श्री. साळवेकर बॅटिंग व बोलिंग. श्री. जोशी बोलिंग. युनायटेड कमर्शिअल...श्री. भिडे बोलिंग. प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल...श्री. यत्ते बोलिंग. श्री. आटकीकर बॅटिंग. देवकरण नानजी...श्री. गुप्ते बॅटिंग.

हे सामने चालू असतांना क्रिकेटप्रेमी येत होतेच. तथापि बँकांचा अधिकारीवर्गहि मधून मधून हजर राहात होता. इंपीरिअल पुणें शाखेचे एजंट श्री. संभावाला, महाराष्ट्र बँकेचे मॅनेजर श्री. जोग, भारत इंडस्ट्रिअलचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. क्षीरसागर व साळवेकर, प्रेसिडेन्सी इं. चे मॅ. डायरेक्टर श्री. चितळे, सेंट्रलचे एजंट श्री. पुरोहित, हे सामनाप्रेक्षकांत प्रमुखपणें दिसत होते.

या सामन्याचा समारोप रविवार ता. १५-३-५३ रोजीं 'समारंभ-सामन्या'नें झाला. हा सामना 'ट्रॉफी' विजयी बँक ऑफ महाराष्ट्र विरुद्ध सर्व बँकांतील निवडक खेळाडू, असा खेळण्यांत आला.

या नवीन उपक्रमांत पुण्यांतील जास्तींत जास्त बँका दरसाल भाग घेऊन हे सामने चिरस्थायी स्वरूपाचे होतील अशी योजना करून हा अभिनव उपक्रम यशस्वी करतील अशी आशा आहे.

---

**एरंडीपासून अत्तर**—पुणें येथील फर्ग्युसन कॉलेजमधील प्राध्यापक श्री. डोळे ह्यांनीं सातारा येथें भाषण करतांना एरंडेल तेलाचे २०० पेक्षा अधिक उपयोग असल्याचें सांगितलें. एरंडेलाची नीट जोपासना केली तर भारताला एक मोठा धंदा प्राप्त होईल असेंहि ते म्हणाले. ह्याच प्रसंगीं एरंडेल तेलापासून तयार केलेलें अत्तर त्यांनीं श्रोत्यांना दाखविलें.

**विड्याच्या पानाचा धंदा**—पाकिस्ताननें विड्याच्या पानावर भारी आयात कर बसविल्यामुळें मध्यभारतामधील पानमळयाच्या धंद्याला वाईट दिवस आले आहेत, असें मध्यभारताच्या व्यापार-मंत्र्यांनीं राज्याच्या विधिमंडळांत सांगितलें.

---


## NOTICE

**The Presidency Industrial Bank, Ltd.,**
**POONA.**

Notice is hereby given that the Sixteenth Ordinary General Meeting of the Shareholders of the Presidency Industrial Bank, Ltd., Poona, will be held on Saturday the 28th March 1953, at the "Commonwealth Building", Laxmi Road, at 4 p. m. to transact the following business :—

1. To receive and consider the Profit and Loss Account, the Balance Sheet and the Report of the Directors and Auditors for the year ending 31st December 1952.
2. To elect the Directors in place of the retiring Directors, who being eligible offer themselves for re election.
3. To appoint Auditor or Auditors and to fix his or their remuneration.
4. To transact any other business as may be allowed by the Chairman.

Poona City,
11th March, 1953.

By order,
C. T. Chitale,
Managing Director.

# दुष्काळाचा प्रश्न सुटण्यास कांहीं पिढ्यांचा काळ लागेल !

## सर्व योजनांसाठी ६०० कोटींचा प्रचंड खर्च

### चीफ इंजीनिअर श्री. चाफेकर यांचें विचारप्रवर्तक भाषण

### (२)

या भागांतील जमिनींत चढउतार पुष्कळ आहेत. येथें कधीं कधीं एकाच वेळीं मोठमोठे मुसळधार पाऊस पडतात. परंतु चढउतारामुळें हें सर्व पाणी फुकट वाहून जातें. विजापूर जिल्ह्यांतील अथणीसारख्या कमी पाऊस पडणाऱ्या ठिकाणीं, एकेकाळीं १७ इंच मुसळधार पाऊस पडल्याचें उदाहरण आहे. पावसाचें वाया जाणारें हें पाणी अडवन धरणें, हाच एक मुख्य उपाय या कामीं सुचतो. म्हणूनच हल्लीं शेतांतून सर्वत्र ताली ऊर्फ बंडिंगचीं दुष्काळी कामें सरकारनें काढलीं आहेत. कोरडवाहू जमिनींत आधुनिक पद्धतीनें पिकें कशीं तयार करावीं, याबद्दल मोठें संशोधन, सोलापूर जवळील मुळेगांव येथें २०—२५ वर्षांपासून चालूं आहे. या संशोधनाचा फायदा दूरचे शेतकरीच नव्हे, तर मुळेगांवचेसुद्धां शेतकरी घेत नाहींत ही दुःखद घटना होय. या संशोधन केंद्रांतील माहिती समंजस शेतकरीसुद्धां घेत नाहींत याचें आश्चर्य वाटतें. या पद्धतीमुळें शेतामध्यें सत्वर भरघोस पीक येतें असें मुळींच नाहीं. परंतु पूर्वी जर दर एकरीं २५० पौंड उत्पादन होत असेल तर या पद्धतीमुळें सुमारें एकरी ४०० पौंडांपर्यंत पिकांत वाढ होते यांत शंका नाहीं. दुष्काळी संकटांत नेहमीं सांपडणाऱ्या दीड कोट एकर जमिनींत या पद्धतीमुळें या प्रमाणांत पिकांची वाढ झाली तर उत्पादनांत केवढा मोठा फरक पडेल, याचा विचार करणें आवश्यक आहे.

या दुष्काळी प्रदेशांतील सुमारें एक कोट लोकसंख्या लक्षांत घेतली म्हणजे एक माणसास दीड एकर जमीन असें प्रमाण पडतें. इतक्या थोड्या जमिनीवर एवढ्या मोठ्या लोकसंख्येचें जीवन चालणें अशक्य असतें म्हणून या भागांतील कांहीं लोकांना उद्योगधंद्यावर जगवावें, असा एक उपाय सुचविला जातो. तसेंच मोठ्या पाटबंधाऱ्याच्या योजना तयार झाल्याशिवाय, येथील परिस्थिति कधींच सुधारणार नाहीं, असेंहि मत अनेकांकडून व्यक्त केलें जातें. सह्याद्रीच्या डोंगरांत जो दोन-अडीचशें इंच पाऊस पडतो, त्याचें पाणी दऱ्याखोऱ्यांत अडवून, दुष्काळी भागांत कालव्यानें पाणी पुरवावें, असें या तज्ज्ञांचें म्हणणें आहे. हल्लीं निरा, गोदावरी, प्रवरा वगैरे मोठ्या नद्या अडवून, याप्रमाणें कांहीं भागांत पाटाचें पाणी दिलें जात असतें. मुळा, कुकडी वगैरे नद्यांवर अशाच पाटबंधाऱ्यांच्या योजना तयार व्हाव्या अशी मागणी आहे. कुकडी योजना तयार झाली तर तें पाणी करमाळें तालुक्यापर्यंत येईल असा अंदाज आहे. या बड्या योजना तयार करण्यास कोट्यावधी रुपये लागतात. शिवाय अशा योजनांचें काम पूर्ण होण्यास पांच दहा वर्षांचा काळ लागतो. अशा योजना तयार झाल्या तरी, फार तर पंधरा वीस लाख एकर जमिनीस पाणी मिळूं शकेल. पाटाचें पाणी मिळूं लागलें म्हणजे माळरानांत देखील नंदनवन निर्माण होतें यांत शंका नाहीं. निरा कालव्यामुळेंच माळशिरस तालुक्यांतील कांहीं भाग आज समृद्ध झाला आहे एकेकाळीं येथील जमिनीची किंमत एकरीं २५ रु. अशी होती. आज या भागांत हजार रुपये दिले तरी एक एकर जमीन मिळूं शकत नाहीं.

दुष्काळी संकट नाहींसें करण्यासाठी "लिफ्ट इरिगेशन" चा एक उपाय आजकाल सुचविला जातो. सोलापूर जिल्हा या दृष्टीनेंहि दुर्दैवी आहे. भीमा नदीशिवाय या भागांतील इतर नद्यांवर अशा योजना तयार होऊं शकतील असें वाटत नाहीं. या योजनेप्रमाणें, या प्रदेशांतील नद्यांच्या उपयुक्त प्रवाहाचा लांबी सुमारें सात-आठशे मैल आहे. या नद्यांतून लिफ्ट इरिगेशननें पाणी दिलें तर, नदीच्या दोन्ही काठापासून फार तर तीन फर्लांगपर्यंतच्या जमिनीस या पाण्याचा उपयोग होईल. म्हणजे या योजनेमुळें जास्तींत जास्त ५ लाख एकर जमिनीस पाणी मिळूं शकेल. या योजनेप्रमाणें, सुमारें ४० ते ६० फूट उंच पाणी पंप करावें लागणार असल्यानें, पंपिंगचा खर्च बराच वाढणार आहे. हा बडा खर्च अन्नधान्याच्या पिकास परवडणार नाहीं. ऊंस वगैरे धान्योत्पादक पिकासच या पाण्याचा उपयोग होईल. सरकारनें अशा दहा-बारा योजनांचा प्रयोग केला परंतु तो अयशस्वी ठरला. आतां हें काम सहकारी सोसायट्यांकडे दिलें गेलें आहे. त्यांचा अनुभव लवकरच कळेल.

दुष्काळी संकट निवारण करण्यासाठी छोटीं तळीं तयार करण्याचा आणखी एक उपाय सुचविला जातो. हिप्परगा तलाव हें एक छोट्या तळ्याचें चांगलें उदाहरण आहे. या प्रदेशांत असे अनेक नाले व ओढे आहेत कीं त्या ठिकाणीं बांध घालून लहान तलाव निर्माण करतां येतील. या छोट्या तलावांची योजना तयार झाल्यास सुमारें ३०—३५ लाख एकर जमिनीस रब्बीच्या पिकासाठीं पाणी देतां येणें शक्य आहे. शेवटीं पाऊस पडणें हें ईश्वराच्या हातींच असतें. कमी जास्त प्रमाणांत पावसाचें जें पाणी जमिनीवर पडतें, तें अडवून त्याचा उपयोग करून घेणें, इतकाच उपाय मानवाच्या हातीं असतो.

दऱ्या-खोऱ्यांतील मोठ्या पाटबंधाऱ्याच्या योजनांचा खर्च, दर एकरीं सुमारें एक हजारापर्यंत येतो. छोट्या तलावयोजना तयार करण्यासाठी दर एकरीं सुमारें ५००—६०० रु. खर्चावे लागतात. लिफ्ट इरिगेशनचा भांडवली खर्च मात्र कमी असतो. हा खर्च दर एकरीं सुमारें अडीचशेपर्यंत जातो. पंधरा वीस लाख एकर जमिनीस पाणी देण्यासाठी उपरोक्त खर्चाचे दरानें, मोठ्या पाटबंधाऱ्याच्या योजनेकरितां सुमारें दीडशें कोट रुपये खर्चावे लागतील. छोट्या तलावयोजनेखालीं ३०—३५ लाख एकर जमीन भिजूं लागली, तर त्यासाठीं सुमारें अडीचशें कोटी रुपये खर्च होईल. लिफ्ट इरिगेशनच्या योजना जर हातीं घेतल्या, तर त्या कामासाठीं सुमारें दहा कोट रुपये राखून ठेवावे लागतील. या प्रदेशांतील एक कोट लोकसंख्येपैकीं, अर्धी लोकसंख्या म्हणजे ५० लाख लोक उद्योगधंद्यावर जगविण्याचें ठरल्यास, त्या योजनेकरितां सुमारें दोनशें कोट रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. म्हणजे या सर्व योजना पूर्ण होण्यास सुमारें सहाशें कोटी रुपयांवर खर्च करावा लागेल. मुंबई राज्याचें दरसालचें एकूण उत्पन्न साठ कोटींचें आहे. म्हणजे, दरसालच्या एकूण उत्पन्नाच्या सुमारें दसपट खर्च या योजनेसाठी करावा लागेल. हे सर्व प्रचंड आंकडे लक्षांत घेतले म्हणजे एखाद्या जादूगाराशिवाय इतरांस या योजना अंमलांत आणणें अशक्य आहे हें स्पष्ट दिसून येईल. दरसाल दहा कोट रुपये या कामीं खर्च झाले तरी देखील वरील सर्व योजना पूर्ण होण्यास साठ वर्षांचा दीर्घकाळ कंठावा लागेल.

शिवाय अशा योजना चुटकीसारख्या निर्माण होऊं शकत नाहींत. त्यासाठी शेंकडों तज्ज्ञांची जरूर असते. लाखों लोकांचे श्रम या कामीं खर्ची पडावे लागतात. पर्जन्याबरोबर ईश्वरानें मुंबई राज्यांत पैशाचा पाऊस पडला, तरी देखील या सर्व योजना संपूर्ण होण्यास अनेक वर्षांचा काळ लोटावा लागेल याप्रमाणें

सर्वत्र समृद्धि झाली, तरी आजच्या लोकसंख्येंत वाढ होणार नाहीं याची काळजी घ्यावी लागेल. कारण, लोकसंख्या वाढली म्हणजे या समृद्धीचें उत्पन्नाहि, या वाढत्या लोकसंख्येस पुरें पडणार नाहीं. म्हणजे या सर्व उपाययोजना अंमलांत आणूनसुद्धां लोकसंख्येच्या वाढीकडे दुर्लक्ष करतां येणार नाहीं. संततीनियमनाच्या या उपायांकडे यापूर्वी बहुसंख्य जनता व सरकार संशयित दृष्टीनें पाहात असे. परंतु " फॅमिली प्लॅनिंग " ऊर्फ कुटुंबनियोजन या गोड नांवाखालीं हा उपाय शेवटीं अंमलांत आणावाच लागेल अशीं आज लक्षणें दिसूं लागलीं आहेत. नांव बदललें तरी अशा योजनांची उपयुक्तता कोणासहि छपवितां येणार नाहीं. ' डेफिसिट बजेटिंग ' या नांवाखालीं तुम्हांस न कळत तुमचा खिसा कापण्याचा जो एक नवा उपाय निघाला आहे, त्याप्रमाणेंच नांव बदलून, कुटुंबनियोजनाची पद्धत यापुढें हळुहळु समाजांत रूढ करावी लागेल.

यापूर्वी दुष्काळ पडला म्हणजे संकटग्रस्त लोक जगविण्यासाठी रस्त्याची खडी फोडण्यासारखीं दुष्काळीं कामें सरकार काढीत असे. दुष्काळी संकट कायमचें नाहींसें करण्यासाठी अशा कामाचा वेळींच उपयोग होत नसे. दुष्काळग्रस्त रायलसिमा भागांत पं. नेहरूंचा नुकताच दौरा झाला, तेव्हांपासून पाटबंधाऱ्याच्या योजनांकडे त्यांचें लक्ष लागलें आहे. म्हणूनच मुंबई सरकारनेंहि हल्ली अशा प्रकारचीं दुष्काळीं कामें आपल्या भागांत सुरू केलीं आहेत. माझ्या मताप्रमाणें या दुष्काळी प्रदेशाबद्दलचे विचार मी प्रगट केले आहेत. या प्रश्नाचें प्रचंड स्वरूप लक्षांत घेतलें म्हणजे तो प्रश्न सुटण्यास कांहीं वर्षेंच नव्हे, तर कांहीं पिढ्यांचा काळ त्यासाठी घालवावा लागेल. म्हणून समंजस जनतेनें या संकटाकडे विधायक दृष्टीनें पहावें असें मला वाटतें. केवळ गाजावाजा करून या आपत्तींतून योग्य मार्ग काढतां येणार नाहीं. —सोलापूर समाचार

**विमानांतील वाचनालय**—एका खंडापासून दुसऱ्या खंडापर्यंत प्रवास करणाऱ्या एका विमान–कंपनीनें विमानांतील-उतारूंच्या मनोरंजनासाठी आपल्या विमानांतून छोटेसें वाचनालय सुरू केलें आहे. वाचनालयांत सध्या २५० पुस्तकें आहेत. सध्या आफ्रिका व अतिपूर्वेकडे जाणाऱ्या विमानांतूनच हा प्रयोग चालू करण्यांत आला आहे. तो यशस्वी झाल्यास इतर विमानांतूनहि तो अवलंबिण्यांत येईल.

**जंगलीं जनावरांचा चित्रपट**—भारतामधील जंगली जनावरांचें जीवन दाखविणारे दोन अनुबोधपट भारत सरकारच्या चित्रपट खात्यातर्फे येत्या मे महिन्यांत तयार करण्यांत येणार आहेत. परकीय प्रवाशांनां भारतांत येण्यास उत्तेजन देण्यासाठी ते परदेशांत दाखविले जाणार आहेत. एलिस डंकन ह्या नांवाचे हॉलिवुडमधील एक तज्ज्ञ ह्या कामासाठीं बोलावण्यांत आले आहेत. सध्या ते आसामच्या जंगलांत पहाणी करीत आहेत.

—: महाराष्ट्राची अग्रेसर कंपनी :—


दि सेन्ट्रल म्युच्युअल लाईफ इन्शुअरन्स कंपनी लि.

पहिल्याच मूल्यमापनांत बोनस जाहीर करून, कंपनीनें असाधारण विक्रम करून दाखविला आहे. दुसऱ्या मूल्यमापनाचें काम चालूं झालें असून, त्यांत निश्चित प्रगति दिसेल अशी खात्री वाटते.

६७ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर

किर्लोस्कर




आमच्या वसंत नं. ३. शरद वगैरे पॉवर चरकांच्या मालिकेंत नवीन "कोयना" चरकाचें आगमन. कमी पॉवर लागत असल्यानें भांडवलांत बचत झाली आहे.

विशेष माहितीसाठीं लिहा—

किर्लोस्कर बंधु. लि., किर्लोस्करवाडी (दं.सातारा)

दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिडयूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग पुणें २.

अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रू. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल रू. ७,११,४८५
खेळतें भांडवल रू. ७५,००,०००

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. द्वा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.

श्री. सी. टी. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर.

### महाराष्ट्र सहकारी विद्यालय, पुणें–२

## ११ व्या शिक्षण-वर्गाचा निकाल

जुलै–डिसेंबर–१९५२ या कालांत झालेल्या को-ऑपरेटिव्ह डिप्लोमा परीक्षेचा निर्णय नुकताच जाहीर झाला. ह्या परीक्षेस बसलेल्या एकूण ६० विद्यार्थ्यांपैकीं ४७ विद्यार्थी पास झाले. म्हणजे निकालाचें प्रमाण शेंकडा ८० इतकें पडतें. विद्यालयाच्या परंपरेला शोभेल असेंच प्रमाण ह्याहि वेळेस पडलें आहे. पास झालेल्या विद्यार्थ्यांची वर्गवारी पुढीलप्रमाणें आहे. ४ विद्यार्थी प्रथम श्रेणींत, ३६ दुसऱ्या श्रेणींत व ७ तिसऱ्या श्रेणींत. तीन विद्यार्थ्यांचा निकाल अद्याप राखून ठेवण्यांत आला आहे.

पहिला क्रमांक व दुसरा क्रमांक अनुक्रमें श्री. भागवत स. बा. व पाटील एस्. एस्. यांचा असून त्यांना प्रत्येकीं २० रु. चीं बक्षिसें जाहीर करण्यांत येत आहेत. तिसरा क्रमांक श्री. वाडेकर यांचा असून त्यांनाहि रु. १० चें बक्षिस जाहीर करण्यांत येत आहे.

पास झालेल्या विद्यार्थ्यांचीं नांवें पुढीलप्रमाणें:—

**१ ला वर्ग**— स. बा. भागवत, मु. रा. केंकेर, शं. स. पाटील आणि व. दा. वाडेकर.

**२ रा वर्ग**— सु. ह. चौधरी, रा. पि. चौगुले, अ. ह. ढमाल, वा. वि. ढवळीकर, गो. द. गर्गे, कृ. सं. घाटगे, ग. पां. गोंटे, वि. म. गोरे, मो. न. गोन्हे, शं. ब. गुरव, शं. ल. गुरव, भा. सु. हरकल, ब. वि. इनामदार, रा. बा. जाधव, स. ह. जोशी, ग. ज. केळकर, वि. स. केसरकर, ब. ना. कुंभार, अ. वि. मादुसकर, दु. र. पाटील, गो. ल. पाटील, का. रा. पाटील, र. का. पाटील, शं. ज्ञा. पाटील, गो. वा. पुजारी, व. ल. सैतवाल, वि. कृ. शहाणे, धों. दा. शिंदे, वि. रा. सावरे, बा. अ. सावंत, रा. शं. सावंत, दि. सं. सूर्यवंशी, बि. दो. तळेले, का. स. ठाकरे, ना. छ. तिवारी, श्री. ब. वारे.

**३ रा वर्ग**— बं. बा. बेदरयाळे, प्र. ना. गोसावी, आ. सु. वजिरे, के. गो. कुलकर्णी, वि. श्री. कुलकर्णी, शं. ग. सावंत आणि रा. ग. सोनावले.

एन्. पी. रणसिंगे.
सुपरिंटेंडेंट.

---

**जपान रेल्वेचें सामान पुरविणार**—रेल्वेचें सामान तयार करणाऱ्या ९ जपानी कारखानदारांचे प्रतिनिधी दिल्लीला आले आहेत. जपानी कारखानदारांचें म्हणणें असें आहे, कीं भारताच्या रेल्वेविषयक गरजा स्वस्त दरानें आणि लवकर पुरविणें जपानला शक्य होईल. भारतानें अजून जपानी कारखानदारांची कोणतीहि टेंडर्स स्वीकारलेलीं नाहींत.

**१५ रुपयांत चर्चची इमारत**—उत्तर ऱ्होडेशिआंतील एका गांवीं आफ्रिकन लोकांच्या मदतीनें फक्त १५ रुपयांत एक चर्च बांधण्यांत आलें. विटा गांवकऱ्यांनींच भाजल्या. वाळू आणि मुंग्यांचीं वारुळें ह्यांचा उपयोग करून सिमेंट बनविण्यांत आलें आणि जंगलांतील लाकूडफाट्याचाहि उपयोग करण्यांत आला.

**कानडांत युरेनिअमविषयक शेअर्सना तेजी**—कानडांत सध्यां युरेनिअम कंपन्यांच्या शेअर्सना भरमसाट भाव आले आहेत. शेंकडों लोकांनीं पूर्वी घेतलेले शेअर्स विकून लक्षाधीश बनण्याची संधि साधली. एका वृद्ध बाईला शेअर्सच्या विक्रींत ३,६०० टक्के नफा झाला.

---


**BHOR STATE BANK LIMITED, BHOR.**

## NOTICE

Notice is hereby given that the 9th Ordinary General Meeting of the Share-holders of the Bhor State Bank Ltd., will be held at 361–62 Budhwar Peth, Poona City on Friday 27th March 1953 at 4 p. m. (S. T.) to transact the following business:—

(1) To receive and consider the Balance Sheet, the Profit and Loss Account and the reports of the Directors and Auditors for the year ended 31st December, 1952.

(2) To declare a Dividend.

(3) To elect Directors in place of the retiring Directors who are eligible for re-election.

(4) To appoint auditors for the current year and fix their remuneration.

(5) To transact such other business as may be allowed by the Chairman.

By Order of the Board,
Bhor, 3rd March, 1953. N. V. Pandav, Manager.

*N. B.*—The Share transfer books of the Bank will be closed from 22nd March to 6th April 1953, (both days inclusive).

---

दि
# बँक ऑफ महाराष्ट्र लि.

स्थापना १९३५ : मुख्य कचेरी–लक्ष्मी रोड, पुणें २

—भांडवल—

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. | ३२,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. | १६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. | ६,१६,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ३,४०,००,००० |


—संचालक मंडळ—

श्री. धों. कृ. साठे (अध्यक्ष) श्री. श्री. गो. मराठे (उपाध्यक्ष)
श्री. न. ग. पवार श्री. मा. रा. जोशी
श्री. फ. दो. पदमजी श्री. मा. वी. शहा
श्री. शं. ल. किर्लोस्कर श्री. भा. म. गुते

बँकेनें गतवर्षाकरितां पूर्वीप्रमाणें ५ टक्के करमाफ डिव्हिडंड जाहीर केला आहे.

चिं. वि. जोग,
मॅनेजर.

नेतृत्व—आमची प्राचीन परंपरा



## जर हिप्पालस वारा वहात असेल

इ. स. च्या चौथ्या शतकाच्या सुमारास गुप्त वंशांतील राजांनीं पुरातन पाटलीपुत्र येथें आपली राजधानी स्थापन केली होती त्याच्या पूर्वीपासूनच बलाढ्य आरमार असलेला देश म्हणून भारताची जगभर ख्याति होती.

अति प्राचीन काळीं म्हणजे इ. स. पूर्वी २७५ वर्षें, सम्राट अशोक राज्य करीत असतांना भारतीय खलाशी ६० हूनहि अधिक दिवसांच्या सफरीवर जात व दूरदूरच्या देशांशीं दळणवळण ठेऊन भारतीय माल पर्शिया, अँटिओक व अलेक्झांड्रिया इत्यादि बाजारपेठांना पुरवीत असत.

दक्षिण भारतांतील क्रांगानूर या बंदरांत अरब व रोमन व्यापारी माल खरेदीसाठीं हमेश येत असत. हिप्पालस वारा अनुकूल दिशेनें वहात असेल तर, ४० दिवसांत या बंदरांत पोहोंचतां येतें असें प्लिनी ( एक तत्कालीन खलाशी ) म्हणत असें. हिप्पालस यानें इ. स. ४५ मध्यें शोध लावलेले हे मन्सून वारेच पश्चिमेकडील देशांतून येणाऱ्या व्यापारी गलबतांना भारतांतील "बारीगाझा", "सोपारा" व इतर बंदरांत वाहून आणीत असत.

पूर्वेकडे सुद्धां, भारतीय व्यापारी–गलबतांच्या साहाय्यानें समुद्रावरून मालाची वाहतूक सदैव चालूच होती. पुढें भारताचा प्रभाव जसजसा दूरवर पसरत गेला, तसतसा त्यानें आपली प्राचीन विद्या व संस्कृति यांचा आसपासच्या देशांना लाभ करून दिला.

आज, भारतीय जहाजें पुन्हा महासागरांत संचार करूं लागलीं असून तीं देशांतील माल जगांतील व्यापारपेठांत पोंचवीत आहेत. या भारतीय पुनरुज्जीवन कार्यांत टाटा स्टील अत्यंत महत्त्वाची कामगिरी बजावतें.

दि टाटा आयर्न ॲण्ड स्टील कंपनी लि.

TN. 3013

हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.